नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/01/2024 (सोमवार) सायंकाळ

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## पोलीस स्टेशन भिवापूरची कारवाई

दिनांक ०८/०१/२०२४ रोजी सकाळी ०८.०० चे दरम्यान पो. स्टे. भिवापूर हद्दीत स्टाफसह पेट्रोलिंग करीत असताना नीलज फाटा ते भिवापूरकडे १२ चक्का टिप्पर ट्रक क्रं. MH-49/AT-4371 येताना दिसला त्यास थांबवून तपासले असता सदर ट्रक मध्ये अंदाजे ०८ ब्रास रेती वाहतूक करतांना मिळून आल्याने टिप्पर चालकास रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने टिप्पर ट्रक क्रं. MH-49/AT-4371 किंमत रु. २५,००,०००/— त्यामध्ये रेती ०८ ब्रास किंमती ४०,०००/—रु. असा एकूण २५,४०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून टिप्पर चालक व मालक यांचेविरुद्ध कलम ३७९, १०९ भा. द. वी. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसुल संहिता १९६६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात मा. उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब उमरेड विभाग, ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद चौधरी, psi सदमेक, स.फौ. भगवान यादव पो.हवा. राकेश त्रिपाठी, पो.शी. रवी वानखडे, चा. पो. शी. सोरते यांनी केली.



## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## पोलीस स्टेशन भिवापूरची कारवाई

पोलीस स्टेशन भिवापूर हद्दीत पो. स्टे. भिवापूर टी पॉईंट येथे स्टाफ सह नाकाबंदी वाहतूक केसेस करीत असता MH-49/AT-5185 हा टिप्पर ट्रक नीलज फाट्याकडून भिवापूर कडे येताना दिसला त्यास थांबवून पाहणी केली असता त्यामध्ये अंदाजे ०६ ब्रास रेती आढळून आल्याने सदर टिप्पर चालकास रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री पटल्याने टिप्पर ट्रक क्र. MH-49/AT-5185 किंमती अंदाजे २०,००,०००/—रू. व त्यामध्ये रेती ०६ ब्रास किंमती ३००००/— रू. असा एकूण २०,३०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पो. स्टे. भिवापूर येथे कलम ३७९, १०९ भा. द. वी. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसुल संहिता १९६६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर